# महाराष्ट्र शासन

## आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**DIRECTORATE OF AYUSH, MAHARASHTRA STATE, MUMBAI.**

**शासकीय दंत महाविद्यालय आणि रुग्णालय इमारत, चौथा मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार,पी.डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.**

4th Floor, Government Dental Collage & Hospital Building, St.George Compound, D' mello Road, Mumbai - 01.

कार्यालय - दुरध्वनी व फॅक्स - ०२२-२२६२६००७ संचालक : ०२२-२२६२२२४७

ई-मेल : directorayurvedmaha@gmail.com वेबसाईट : www.mahaayush.in


क्र.आसंमुं/शाआसुम-नां/पीबीडीएएन-प्रवेशप्रक्रीया-२०२६-२७/२०२६/आयु-२ दिनांक : ०५.०८.२०२६

## "जाहीर सूचना"

विषय : शासकीय आयुर्वेद शुश्रुषा महाविद्यालय, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय परिसर, वझिराबाद, नांदेड या संस्थेत **शैक्षणिक वर्ष** २०२६-२७ करिता "**पोष्ट बेसिक डिप्लोमा इन आयुर्वेद स्पेशालिटी नर्सिंग**" अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रीया राबविणेबाबत.

सक्षम अधिकारी तथा संचालक, आयुष संचालनालय, मुंबई यांच्यामार्फत "शासकीय आयुर्वेद सुश्रूषा महाविद्यालय, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय परिसर, वजिराबाद, नांदेड" या शिक्षण संस्थेमध्ये "पोस्ट बेसिक डिप्लोमा इन आयुर्वेद स्पेशिलीटी नर्सिंग" या अभ्यासक्रमासाठी सन २०२६ - २०२७ करिता अर्हताप्राप्त उमेदवारांकडून प्रवेश अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १) | माहिती पुस्तिका व प्रवेश अर्ज विक्री दिनांक व ठिकाण | ❖ दिनांक: ०७.०८.२०२६ ते दि.१७.०८.२०२६<br>❖ सकाळी १०.०० ते सांयकाळी ५.०० पर्यंत<br>❖ शासकीय आयुर्वेद शुश्रुषा महाविद्यालय, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय परिसर, वजिराबाद, नांदेड.<br>❖ खोली क्र.६३ (प्राचार्य कार्यालय), शासकीय आयुर्वेद रुग्णालय, नांदेड |
| २) | प्रवेश अर्ज स्विकृतीचा अंतिम दिनांक | दिनांक: ०७.०८.२०२६ ते दिनांक १८.०८.२०२६<br>सकाळी १०.०० ते सांयकाळी ५.०० पर्यंत |
| ३) | जातीचा प्रवर्ग व शुल्क | **खुला वर्ग**- रुपये १०००/- (एक हजार रुपये मात्र)<br>**राखीव प्रवर्ग**- रुपये ५००/- (पाचशे रुपये मात्र) |
| ४) | वयोमर्यादा | खुल्या प्रवर्गाकरीता ४५ वर्ष व राखीव प्रवर्गाकरीता ५० वर्ष राहील. |

**महत्वाची सूचना:-**

१) शासकीय सेवेत कार्यरत असणाऱ्या उमेदवारांनी त्यांचे अर्ज योग्य यंत्रणेमार्फत (ते ज्या कार्यालयात कार्यरत आहेत त्या संबंधित संस्थाप्रमुखांमार्फत त्यांच्या Covering Letter व NOC सहित) प्राचार्य, शासकीय आयुर्वेद सुश्रूषा महाविद्यालय, वजिराबाद, नांदेड यांचेकडे थेटरित्या सादर करावेत. कोणत्याही कर्मचाऱ्याने आयुष संचालनालयास अर्ज सादर करु नयेत. पोस्टाने पाठवू नयेत अथवा परस्पर संचालनालयाच्या टपालात जमा करु नयेत. संचालनालयास प्राप्त झालेल्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

२) आयुष संचालनालयाच्या अधिनस्त व वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय अधिनस्त तसेच आरोग्य सेवा संचालनालयाच्या अधिनस्त संबंधित संस्थाप्रमुखांनी कर्मचाऱ्यांचे/उमदेवारांचे मूळ किंवा छायांकित अर्ज आयुष संचालनालयास सादर करु नयेत/पाठवू नयेत. वरीलप्रमाणे नमुद केल्यानुसार कर्मचाऱ्याने/उमेदवाराने शासकीय आयुर्वेद सुश्रूषा महाविद्यालय, वजिराबाद, नांदेड या संस्थेत थेटरित्या सादर करावेत.

३) प्राचार्य, शासकीय आयुर्वेद सुश्रूषा महाविद्यालय, वजिराबाद, नांदेड या संस्थेच्या संस्थाप्रमुखांनी सुध्दा त्यांच्याकडे प्राप्त झालेले मूळ किंवा छायांकित अर्ज आयुष संचालनालयास सादर करु नयेत/पाठवू नयेत. फक्त अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास प्राप्त झालेल्या अर्जदारांची यादी संचालनालयाच्या ईमेलवर संस्थाप्रमुख/प्राचार्याच्या स्वाक्षरीने पाठविण्यात यावी.

४) खाजगी महाविद्यालयातील उमेदवारांनी शासकीय आयुर्वेद सुश्रूषा महाविद्यालय, वजिराबाद,नांदेड या संस्थेतून अर्ज प्राप्त करुन त्याच संस्थेत जमा करावेत.

५) माहिती पुस्तिका व प्रवेश अर्जाच्या शुल्काचा (ना परतावा) धनाकर्ष (डी डी) **DEAN, GOVERNMENT AYURVED COLLEGE, NANDED** यांचे नावे स्विकारण्यात येईल. माहिती पुस्तिका www.mahaayush.in या संकेतस्थळावर माहितीकरीता उपलब्ध आहे.

६) प्रवेशप्रक्रीयेची अद्ययावत माहिती वेळोवेळी शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. सर्व उमेदवारांनी अद्ययावत माहिती (updates) साठी अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड यांचे संकेतस्थळ (website) चे www.gacnanded.com वेळोवेळी अवलोकन करावे.

७) सर्व प्रवेश प्रक्रियांच्या याद्या (All admission process list) शासकीय आयुर्वेद महाविद्यालयाच्या सूचना फलकावर लावण्यात येतील, याची वेळोवेळी विद्यार्थ्यांनी / उमेदवारांनी अवलोकन करावे.

८) विद्यार्थ्यांचे / उमेदवारांचे Clarification of Doubts Objection हे प्रत्यक्ष विद्यार्थ्याने / उमेदवाराने शासकीय आयुर्वेद सुश्रूषा महाविद्यालय, नांदेड येथे प्रत्यक्ष येऊन द्यावे किंवा विद्यार्थ्याने / उमेदवाराने स्वत:चे अधिकृत ई-मेलद्वारे शासकीय आयुर्वेद सुश्रूषा महाविद्यालय यांचे gancnanded@gmail.com या ई-मेलवर पाठवावे.

स्वाक्षरी /-
(वैद्य रामन घुंगराळेकर)
संचालक आयुष,
आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.